# डॉ. नरेंद्र दाभोलकर

## व्यक्ती आणि विचार



प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण

# डॉ. नरेंद्र दाभोलकर

## व्यक्ती आणि विचार

प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण

निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर

अंधश्रद्धा निर्मूलनाचा ध्यास मनात घेऊन
विज्ञाननिष्ठ समाजरचनेचा आग्रह धरणाऱ्या
सर्व विचारवंत व कार्यकर्त्यांना...

# भूमिका

२० ऑगस्ट २०१३. सकाळचे वातावरण नेहमी सारखेच होते. कॉलेजकडे जाण्यासाठीची तयारी सुरू होती. त्याचवेळी एका मित्राचा फोन आला. फोन उचलून हॅलो म्हणण्याच्या अगोदर 'तुला कळलं का?' अशी विचारणा झाली. मी म्हटलं 'काय?'...'अरे दाभोलकरांना गोळ्या घातल्या.' मित्राचा आवाज धाप लागल्यासारखा वाटत होता. मी पुन्हा विचारलं 'कुणाला?' 'अरे डॉ. नरेंद्र दाभोलकरांना सकाळी कुणीतरी मारलं... पुण्यामध्ये...' मी फोन बंद केला. अक्षरशः अवसान संपल्यासारखं वाटलं. मला काय करावे सूचत नव्हते. कोणीतरी खूप जवळचं आपल्यातून निघून गेल्यासारख वाटतं होतं. माझ्या डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली...

कॉलेजमध्ये आलो तर डॉक्टरांच्या खूनाविषयचीच चर्चा सुरू होती. २१ वर्षापूर्वी आमच्या शहाजी महाविद्यालयातील एका कार्यक्रमासाठी डॉक्टर आले होते. स्वाभाविकपणे त्या आठवणींना उजाळा मिळत होता. त्यांचे बोलणे, लोकांशी संवाद साधने, मुद्दा पटवून देणे अशा अनेक गोष्टींची चर्चा सुरू होती. सर्वांचा सूर एकच होता... खूप वाईट झालं हे असं व्हायला नको होतं... मी अस्वस्थ पण शांत होतो. डोळे वारंवार अश्रूंनी डबडबत होते. माझा संपूर्ण दिवस डॉक्टरांच्या खूनाच्या वेदनादायी सावटाखाली होता.

खरं तर माझा आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा परिचय नव्हता. आयुष्यात फक्त एकदा त्यांना पाहिले होते, तेही कॉलेजमधील कार्यक्रमावेळी. मग माझी अवस्था अशी का झाली असावी? घरी आलो. माझे लक्ष कुठेही लागत नव्हते. पुन्हापुन्हा एक प्रश्न मनात यायचा. का मारले त्यांना? त्यांनी कुणाचे काय वाईट केलं होतं? अक्षरशः तीन दिवस माझी अस्वस्थता राहिली.




**प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण**
४३ सोनसावली, नर्मदा पार्क,
इंगवले कॉलनी, फुलेवाडी
कोल्हापूर-४१६०१०
मो. ९९६०९९५८५३


'डॉ. नरेंद्र दाभोलकर : व्यक्ती आणि विचार' ग्रंथात डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी वैचारिक पक्ष स्पष्ट करताना अंधश्रद्धेचे स्वरूप तीन भागात स्पष्ट केले आहे. एक आहे 'अंधश्रद्धा', दुसरा आहे 'धर्म' आणि तीन विवेकवाद. अंधश्रद्धेचा संबंध वैचारिक धारणेशी असून धर्माचा संबंध कर्मकांडाशी आहे. विवेकवादी विज्ञाननिष्ठ मनुष्य घडायचा तर जुन्या धारणांमधून जसा तो मुक्त व्हायला हवा, तसाच तो उपवास-तापास, व्रत-वैकल्य, करणी-भानामतीतूनही. सदरची संशोधनात्मक मांडणी हे सारे समजावते म्हणून ते लोकप्रबोधनाचे प्रभावी साधन बनून पुढे येते. डॉ. दाभोलकर कोणा एका विशिष्ट धर्म व आचरणाविरुद्ध नव्हते. सर्व धर्मांतील दैवीकरण व कर्मकांडाच्या, अंधश्रद्धांच्या निर्मूलनाबद्दल ते आग्रही होते. ईश्वरकेंद्री मानव व्यवहार मनुष्यकेंद्री व्हावा म्हणून असलेली त्यांची धडपड अधोरेखित करणे हा या वैचारिक लेखनाचा उद्देश आहे. त्या अर्थाने हे लेखनही पुरोगामी माणूस घडणीचाच खटाटोप होय.

ग्रंथ हवा असल्यास...
फोन/गुगल पे नंबर
९८२२४७२१०९

NIRMITI PRAKASHAN
+91 98224 72109

Scan & Pay

रु. ३००/-


# निर्मिती प्रकाशन

८७३, क/२, सी वॉर्ड, सिध्दीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर – ४१६००२
मो. ९८९०५५४३४०, ९८२२४७२१०९

ISBN : 978-93-92922-63-3